मटा - 18 जानेवारी - 2020



व्ही. टी. पाटील स्मृतिभवनात झालेल्या कार्यक्रमात बोलताना प्रा. डॉ. सुभाष देसाई. उपस्थितांत डावीकडून अशोक पर्वते, डॉ. एस. एन. पवार, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, संस्थेचे सचिव प्राजक्त पाटील.

# व्ही. टी. पाटील यांचे विचार आजच्या पिढीला प्रेरणादायी

कोल्हापूर टाइम्स टीम

'शिक्षणमहर्षी डॉ. व्ही. टी. पाटील अखेरपर्यंत महिला सक्षमीकरण, तळागाळापर्यंत शिक्षण पोहोचविण्यासह विधायक समाजनिर्मितीसाठी सातत्याने झटले. बहुजन समाजाच्या विकासासाठी प्रस्थापितांविरोधात लढा देणारे समाजसुधारक होते. त्यांचे काम आजच्या पिढीला प्रेरणादायी आहे,' असे गौरवोद्गार प्रा. डॉ. सुभाष देसाई यांनी काढले. ताराराणी विद्यापीठ आणि गारगोटी येथील श्री मौनी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रम संस्थेच्या व्ही. टी. पाटील स्मृतिभवनात झाला.

## प्रा. डॉ. सुभाष देसाई यांचे गौरवोद्गार

दरम्यान, आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते झाले. शाल, श्रीफळ, प्रमाणपत्र, रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. कमला कॉलेजच्या अर्थशास्त्र विभागाच्या डॉ. अनघा पाठक यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

'व्यक्ती आणि कार्य' या विषयावर डॉ. सुभाष देसाई यांचे व्याख्यान झाले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पवार, डॉ. अशोक पर्वते-पाटील, प्रा. ए. ए. साळोखे, प्रा. अनिल घस्ते, सी. आर. गोडसे, आदी उपस्थित होते. ताराराणी विद्यापीठाचे सचिव प्राजक्त पाटील यांनी आदर्श शिक्षक पुरस्काराचे सन्मानपत्राचे वाचन केले. उषाराजे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्मृतिगीत गायिले. पी. आर. मंडलिक यांनी स्वागत केले. प्रा. डॉ. सुजय पाटील यांनी प्रास्ताविक केले. एस. डी. चव्हाण यांनी आभार मानले.

Scanned by CamScanner